**CNR MHST-0500-1523-2024**

**विशेष दिवाणी दावा क्र.१०३/२०२४**

**विनोद शंकर संकपाळ**

**वि.**

**१. श्री. तुकाराम ज्ञानदेव संकपाळ व इतर**

**वादींतर्फे विधीज्ञ – एस. व्ही. थोरात**

**प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री. आर. सी. शहा.**

**निशाणी ४२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.८ यांनी त्यांना दाव्यातून कमी करावे व विनाकारण त्यांना दाव्यात पक्षकार केले या कारणासाठी नुकसान भरपाई मिळावी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील क्रम १ नियम १० (२) अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, वादी यांनी दावा प्रतिवादी यांचेविरूध्द वाटपासाठी, जाहिर ठरावासाठी, निरंतरची मनाई हुकूम मिळावी या व इतर तदनुषंगिक बाबींकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.८ हे व्ही. के. नांगरे उपविभागीय अधिकारी, आरफळ पाटबंधारे, मसूर ता. कराड, जि. सातारा असे दर्शविलेले आहेत. नमूद प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार आवश्यकता नसताना त्यांना दाव्याच्या समन्सची बजावणी झालेली आहे. परिणामी त्यांचा शासनाचा वेळ, खर्च विनाकारण वाया झालेला आहे. तर वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.८ यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीचे उता–याला आहे. दावा मिळकतींपैकी ०.७ गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्र.८ यांच्या ताब्यात आहे. त्यामुळे ते दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. म्हणून त्यांना दाव्यात पक्षकारपणात सामील केले आहे. वादी यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द कोणतीही मागणी केलेली नाही. परंतू, प्रस्तुत अर्जातील कथन पाहता प्रतिवादी हे नुकसान भरपाईची रक्कम मिळणेस पात्र ठरत नाहीत.

०४. येथे हे प्रामुख्याने नमूद करणे आवश्यक आहे की, वादी हे दाव्याचे मालक असतात. दाव्यामध्ये कोण पक्षकारपणामध्ये सामील करायचे व कोणास सामील करावयाचे

नाही याबाबत वादी यांना पूर्ण अधिकार असतात. परंतू, अपसंयोजन हे तत्व दाव्यास मारक ठरत नाही व त्यामुळे दावा अयशस्वीही होत नाही. अपसंयोजनाच्या हरकतीचा निकाल वादपत्रामध्ये काय म्हटले आहे यामधून करणे आवश्यक आहे. योग्य असे पक्षकार दाव्यात सामील केले नाहीत ही गोष्ट दाव्यास मारक होत नाही. आवश्यक पक्षकार जर दाव्यात पक्षकार केले नसेल तर न्यायालयाने दावा सरळ सरळ न फेटाळता वादीस त्या आवश्यक पक्षकारास दाव्यात सामील करण्याची संधी दिली पाहिजे. तसेच, पूर्ण व परिणामकारक अनुतोष दिला जावू शकत असेल तर इतरांना पक्षकार म्हणून सामील करण्याची आवश्यकता नाही. वादी यांनी प्रतिवादी क्र.८ यांचे नाव दावा मिळकतीपैकी ७ गुंठे क्षेत्राला नमूद असल्याने पक्षकार म्हणून सामील केले होते असे कथन केले आहे. या वरून ते योग्य ते पक्षकार असल्याचे दिसून येतात. परंतू, वादी यांनीच प्रस्तुतच्या अर्जामध्ये म्हणणे देतेवेळी वादी यांनी प्रतिवादी क्र.८ चे विरूध्द कोणतीही दाद मागितलेली नाही असे नमूद केले आहे. या वादीच्या म्हणण्याचा विचार करता प्रतिवादी क्र.८ यांना जर प्रस्तुतच्या दाव्यामधून कमी केले गेले तर त्यावेळी देखील दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पूर्णपणे अधिनिर्णय करून तो दावा निकालात काढणे शक्य होवू शकते असे वादी यांचेच कथनावरून दिसून येते. वर नमूद कायद्याच्या स्थापित स्थितीचा, कायदेशीर तरतूदींचा व दोन्ही पक्षकारांनी केलेल्या कथनांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याचे दिसून येते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्र.४२) चा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी प्रतिवादी क्र.८ चे नाव दाव्यातून कमी करावे.

SUDHIR BALASAHEB TODKAR
Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2025.09.18 12:15:12 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः १७/०९/२०२५ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.